**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. शिससं/उशि/पुवि/२०१९-२०/महाडीबीटी/ 131 दिनांक : १५.०१.२०२०

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**विषय : - राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेच्या अंमलबजावणीबाबत**

संदर्भ : - १. मा. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/४७२ दि. १४.०१.२०२०.
२. या कार्यालयाचे पत्र क्र. शिससं/उशि/पुवि/२०१९-२०/महाडीबीटी/१२३, दि. १५.०१.२०२०.
३. मा. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/५०१ दि. १५.०१.२०२०.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्य शासनाच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून महाडीबीटी पोर्टल विकसित करण्यात आलेले आहे. सन २०१९-२० करीता महाडीबीटी पोर्टलवरुन शिष्यवृत्ती योजनांसाठी पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. यामध्ये उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे. याबाबतीत सर्व महाविद्यालय, संस्था, विद्यापीठांना वेळोवेळी परिपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे. **सदर शिष्यवृत्ती योजनेसाठी शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि. १५.०१.२०२० अशी आहे.**

**दि. १५.०१.२०२० रोजीच्या डीबीटी डॅशबोर्ड नुसार, सन २०१८-१९, सन २०१९-२० करीता सदर शिष्यवृत्तीसाठी पुणे विभागांतर्गत प्राप्त झालेल्या अर्जांची स्थिती खालीलप्रमाणे आहे.**

Scanned by CamScanner

| REGION | F.Y. 2018-19 | | | F.Y. 2019-20 | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | APPLICATION RECEIVED | APPROVE D BY DEPT. | CANCELLED & REJECTED | APPLICATIO N RECEIVED | PENDING AT INSTITUTE | APPROVE D BY DEPT. | PENDING AT DEPT. | SENT BACK TO APPLICANT | CANCELLED & REJECTED |
| PUNE | 59,996 | 44,082 | 15,914 | 45,484 | 3,725 | 31,813 | 3,936 | 1,662 | 4,348 |

सदरहू डीबीटी डॅशबोर्ड अहवालानुसार राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेसाठी सन २०१९-२० मध्ये मागील वर्षाच्या (सन २०१८-१९) तुलनेत कमी अर्ज प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. सदर शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळणे आवश्यक आहे.

सबब सदर शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाहीत यासाठी, सदर शिष्यवृत्तीची माहिती विद्यार्थी / पालक यांच्या पर्यंत विविध माध्यमातून व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. सदर शिष्यवृत्तीसाठी मोठ्या प्रमाणात अर्ज प्राप्त होतील व शिष्यवृत्तीपासून पात्र विद्यार्थी वंचित राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी. सदर शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थी वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/विद्यापीठांचे कुलसचिव यांची राहील याची नोंद घ्यावी.

(डॉ. मोहन खताळ)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.

Scanned by CamScanner